"बृहन्मुंबई महानगरपालिका प्रभाग रचना व आरक्षण करण्याबाबतचे सुधारणा आदेश, २०२२"

सत्यमेव जयते

# राज्य निवडणूक आयोग,महाराष्ट्र

क्रमांक - रानिआ/मनपा-२०२१/प्र.क्र. २२ /का-५
नवीन प्रशासकीय भवन, मादाम कामा रोड,
हुतात्मा राजगुरू चौक, मुंबई- ४०००३२.
दिनांक : २२ जुलै, २०२२

## आ दे श

ज्याअर्थी, राज्य निवडणूक आयोगाने बृहन्मुंबई महानगरपालिकेच्या सार्वत्रिक निवडणुकीकरिता सदस्य संख्या, प्रभाग रचना व आरक्षण निश्चित करण्याकरिता समक्रमांकाच्या दि. २९ डिसेंबर, २०२१ च्या आदेशान्वये सविस्तर कार्यपध्दती विहित केलेली आहे.

आणि ज्याअर्थी, महाराष्ट्र अध्यादेश क्रमांक-६/२०२१, दि. १/१०/२०२१ :- या अन्वये महानगरपालिकेमध्ये नागरिकांच्या मागासवर्ग प्रवर्गाकरिता राखून ठेवावयाच्या जागांची संख्या एकूण जागांच्या संख्येच्या २७ टक्क्यांपर्यंत असेल, मात्र एकूण आरक्षण महानगरपालिकेच्या एकूण जागांच्या ५० टक्क्यांपेक्षा अधिक असणार नाही अशा आशयाची तरतूद केली. मात्र सदर सुधारणेबाबत मा. सर्वोच्च न्यायालयामधील रिट याचिका क्र. ८४१/ २०२१, विशेष अनुमती याचिका क्र. १९७५६ / २०२१ व रिट याचिका क्र. १३१६ / २०२१ मध्ये दि. १५/१२/२०२१ रोजी झालेल्या निर्णयास अनुसरुन जोपर्यंत राज्य शासन त्रिस्तरीय चाचणी करुन स्थानिक स्वराज्य संस्थांमधील नागरिकांच्या मागासवर्ग प्रवर्गाचे प्रमाण निश्चित करून त्याबाबत तरतूद करत नाही तोपर्यंत आगामी सार्वत्रिक / पोटनिवडणुकांमध्ये नागरिकांच्या मागासवर्ग प्रवर्गाच्या जागा सर्वसाधारण म्हणून अधिसूचित करुन निवडणुका घ्याव्या लागतील असे मा. सर्वोच्च न्यायालयाने निर्देशित केले. त्यामुळे राज्य निवडणूक आयोगाने दि. २९ डिसेंबर, २०२१ च्या आदेशातील परिच्छेद क्र. ४.२ व १० मध्ये

सद्यस्थितीत नागरिकांच्या मागासवर्ग प्रवर्गाकरिता कोणत्याही जागा देय होणार नाही अशी तरतूद केली आहे.

आणि ज्याअर्थी, मा. सर्वोच्च न्यायालयामधील विशेष अनुमती याचिका क्र. १९७५६/२०२१ मध्ये दि. १२ जुलै, २०२२ रोजी झालेल्या सुनावणीच्यावेळी शासनाने स्थानिक स्वराज्य संस्थांमधील नागरिकांच्या मागासवर्ग प्रवर्गाचे प्रमाण निश्चित करण्याकरिता गठीत केलेल्या समर्पित मागासवर्ग आयोगाने आवश्यक त्या बाबींची पूर्तता करुन दि. ७ जुलै, २०२२ रोजी आपला अहवाल शासनास सादर केल्याची बाब शासनाने अर्ज क्र. ९२६९५/२०२२ अन्वये मा. सर्वोच्च न्यायालयाच्या निदर्शनास आणून दिली व ज्याअर्थी मा. सर्वोच्च न्यायालयाने दि. २० जुलै, २०२२ रोजीच्या सुनावणीत राज्य निवडणूक आयोगाने यापुढील निवडणुकांमध्ये समर्पित मागासवर्ग आयोगाने केलेल्या शिफारशी विचारात घेऊन पुढील निवडणुका घेण्याबाबत आदेश दिले आहेत.

आणि ज्याअर्थी, मा. सर्वोच्च न्यायालयाने दि. २० जुलै, २०२२ रोजी दिलेल्या उपरोक्त आदेशास अनुसरुन महानगरपालिकांच्या निवडणुकांमध्ये नागरिकांच्या मागासवर्ग प्रवर्गाकरिता जागा राखून ठेवण्याच्या अनुषंगाने योग्य ती तरतूद करणे आवश्यक झाले आहे.

**त्याअर्थी,** मी, यु. पी. एस. मदान, राज्य निवडणूक आयुक्त, महाराष्ट्र, भारतीय संविधानाच्या अनुच्छेद २४३ झेडए व मुंबई महानगरपालिका अधिनियम, १८८८ च्या कलम १८अ नुसार मिळालेल्या व इतर प्राप्त अधिकारांचा वापर करून बृहन्मुंबई महानगरपालिकेच्या सार्वत्रिक निवडणुकीकरिता सदस्य संख्या ठरविणे, प्रभाग रचना करणे व आरक्षण चक्रानुक्रमे फिरविणे याकरिता खालीलप्रमाणे आदेश देत आहे :-

१. **संक्षिप्त नाव:**

या आदेशाला " **बृहन्मुंबई महानगरपालिका सार्वत्रिक निवडणूक (प्रभाग रचना व आरक्षण) सुधारणा आदेश, २०२२** " असे संबोधिले जाईल.

२. दि. २९ डिसेंबर, २०२१ च्या आदेशातील मूळ परिच्छेद क्र. ४.२ च्या उपपरिच्छेदा ऐवजी खालील उपपरिच्छेद समाविष्ट करण्यात येत आहे :-

"समर्पित मागासवर्ग आयोगाच्या शिफारशीनुसार बृहन्मुंबई महानगरपालिकेत त्याच्या एकूण जागांपैकी नागरिकांच्या मागासवर्ग प्रवर्गाकरिता शिफारस केल्यानुसार एकूण जागांच्या २७% इतक्या जागा नागरिकांच्या मागासवर्ग प्रवर्गाकरिता देय होतील. मात्र महाराष्ट्र अधिनियम क्र. २०/२०२२ नुसार जर अनुसूचित जाती, अनुसूचित जमाती व नागरिकांचा मागासवर्ग प्रवर्ग यांच्या आरक्षणाचे एकूण प्रमाण हे एकूण जागांच्या ५० टक्क्यापेक्षा अधिक होत असेल तर एकूण आरक्षित जागा ५० टक्क्यांच्या मर्यादेत ठेवण्यात येतील."

३. दि. २९ डिसेंबर, २०२१ च्या आदेशातील परिच्छेद क्र. ६(i) मधील शेवटच्या ओळीत "(अनुसूचित जाती व अनुसूचित जमाती)" या ऐवजी "(अनुसूचित जाती, अनुसूचित जमाती व नागरिकांच्या मागासवर्ग प्रवर्ग)" असे समाविष्ट करण्यात येत आहे.

४. दि. २९ डिसेंबर, २०२१ च्या आदेशातील मूळ परिच्छेद क्र. ७(ii) ऐवजी खालील परिच्छेद समाविष्ट करण्यात येत आहे :-

"नागरिकांचा मागासवर्ग प्रवर्ग व महिलांचे आरक्षण (अनुसूचित जाती, अनुसूचित जमाती व नागरिकांच्या मागासवर्ग प्रवर्गातील महिलांसह) निश्चित करताना देखील वरील उदाहरणात दर्शविल्यानुसार शक्यता उद्भवत असल्यास त्या प्राधान्यक्रमाने प्रभागांचा आरक्षणाकरीता विचार करण्यात येईल."

५. दि. २९ डिसेंबर, २०२१ च्या आदेशातील मूळ परिच्छेद क्र. १० ऐवजी खालील परिच्छेद समाविष्ट करण्यात येत आहे :-

"१०. नागरिकांच्या मागासवर्ग प्रवर्गाकरिता आरक्षित प्रभाग निश्चित करणे :-

"समर्पित मागासवर्ग आयोगाच्या शिफारशीनुसार बृहन्मुंबई महानगरपालिकेत त्याच्या एकूण जागांपैकी नागरिकांच्या मागासवर्ग प्रवर्गाकरिता शिफारस केल्यानुसार एकूण जागांच्या २७% इतक्या जागा नागरिकांच्या मागासवर्ग प्रवर्गाकरिता देय होतील. मात्र महाराष्ट्र अधिनियम क्र. २०/२०२२ नुसार जर अनुसूचित जाती, अनुसूचित जमाती व नागरिकांचा मागासवर्ग प्रवर्ग

यांच्या आरक्षणाचे एकूण प्रमाण हे एकूण जागांच्या ५० टक्क्यापेक्षा अधिक होत असेल तर एकूण आरक्षित जागा ५० टक्क्यांच्या मर्यादेत ठेवण्यात येतील.

नागरिकांच्या मागासवर्ग प्रवर्गाकरिता आरक्षित प्रभाग निश्चित करताना प्रथम या निवडणुकीकरिता अनुसूचित जाती व अनुसूचित जमातीकरिता आरक्षित झालेले प्रभाग वगळण्यात यावेत. त्यानंतर मागील निवडणुकांमध्ये (सन २००७, २०१२ व २०१७) नागरिकांच्या मागासवर्ग प्रवर्गाकरिता आरक्षित झालेले प्रभाग वगळण्यात यावेत. असे करताना परिच्छेद क्र. ६ व ७ मधील सूचना विचारात घ्याव्यात. त्यानंतर शिल्लक राहिलेल्या प्रभागांमधून सोडतीने नागरिकांच्या मागासवर्ग प्रवर्गाकरिता आरक्षित प्रभाग निश्चित करण्यात यावेत. "

६. दि. २९ डिसेंबर, २०२१ च्या आदेशातील परिच्छेद क्र. ११.२ नंतर खालील परिच्छेद समाविष्ट करण्यात येत आहे :-

"११.३ नागरिकांच्या मागासवर्ग प्रवर्गाच्या महिलांकरिता आरक्षित प्रभाग निश्चित करणे- नागरिकांच्या मागासवर्ग प्रवर्गातील महिलांकरिता आरक्षित प्रभाग निश्चित करण्याकरिता नागरिकांच्या मागासवर्ग प्रवर्गाकरिता आरक्षित झालेल्या प्रभागांमधून सोडत काढण्यात यावी. मात्र मागील निवडणुकांमध्ये (सन २००७, २०१२ व २०१७) नागरिकांच्या मागासवर्ग प्रवर्गातील महिलांकरिता आरक्षित झालेले प्रभाग त्यावेळी वगळण्यात यावेत. "

७. दि. २९ डिसेंबर, २०२१ च्या आदेशातील मूळ परिच्छेद क्र. ११.३ चा अ.क्र. ११.४ असा बदलण्यात यावा व त्यापरिच्छेदातील पहिल्या वाक्यातील -

" एकूण प्रभागांमधून अनुसूचित जाती व अनुसूचित जमातीकरिता आरक्षित झालेले" या शब्दांऐवजी "एकूण प्रभागांमधून अनुसूचित जाती, अनुसूचित जमाती व नागरिकांच्या मागासवर्ग प्रवर्गाकरिता आरक्षित झालेले" असे शब्द समाविष्ट करण्यात यावेत.

८. दि. २९ डिसेंबर, २०२१ च्या आदेशातील मूळ परिच्छेद क्र. १२ मधील शिर्षक व परिच्छेद क्र. १२.१ मध्ये "(अनुसूचित जाती व अनुसूचित जमातीतील महिलांसह)" या ऐवजी

"(अनुसूचित जाती, अनुसूचित जमाती व नागरिकांच्या मागासवर्ग प्रवर्गातील महिलांसह)"
असे समाविष्ट करण्यात येत आहे.

वरील सुधारणांना अनुसरुन दि. २९ डिसेंबर, २०२१ च्या आदेशासोबतचे परिशिष्ट-१ यासोबत जोडल्यानुसार अंशतः सुधारित करण्यात येत आहे. समर्पित मागासवर्ग आयोगाने बृहन्मुंबई महानगरपालिकेकरिता नागरिकांच्या मागासवर्ग प्रवर्गाकरिता देय जागांची टक्केवारी २७ टक्के इतकी निश्चित केली असून त्यानुसार बृहन्मुंबई महानगरपालिकेस त्यांच्या वाढीव सदस्य संख्येनुसार देय होणाऱ्या नागरिकांच्या मागासवर्ग प्रवर्गाच्या जागा सोबतच्या परिशिष्ट-२ मध्ये दर्शविल्या आहेत.

( यु. पी. एस. मदान )
राज्य निवडणूक आयुक्त,महाराष्ट्र

सहपत्र :-
परिशिष्ट १ व २

प्रति,

१. आयुक्त, बृहन्मुंबई महानगरपालिका .
२. अपर मुख्य सचिव, नगर विकास विभाग, मंत्रालय, हुतात्मा राजगुरु चौक, मुंबई ४०० ०३२
३. विभागीय आयुक्त, कोकण विभाग.
४. जिल्हाधिकारी, मुंबई शहर व उपनगर
५. मा. सर्वोच्च न्यायालय व मा. उच्च न्यायालयातील राज्य निवडणूक आयोगाचे वकील
६. आयोगातील सर्व कार्यासने
७. निवड नस्ती.

# परिशिष्ट - १

## (सदस्य संख्या व आरक्षणाची परिगणना)

## बृहन्मुंबई महानगरपालिका सार्वत्रिक निवडणूक ---------- (सन)

९. नागरिकांच्या मागासवर्ग प्रवर्गाकरिता राखून ठेवावयाच्या एकूण जागा -
(स्त्रियांसाठी राखून ठेवावयाच्या जागा धरुन)

$$( \text{सूत्र} = \frac{\text{समर्पित मागासवर्ग आयोगाने शिफारस केलेली टक्केवारी}}{100} \times \text{महानगरपालिकेची एकूण सदस्य संख्या} )$$

**टीप** :- अ.क्र. ९ येथे नागरिकांचा मागासवर्ग प्रवर्गाची गणना करताना जेथे समर्पित आयोगाने २७ % इतक्या आरक्षणाची शिफारस केली आहे. त्या ठिकाणी जागांची गणना करताना अपूर्णांक वगळण्यात यावा.

१०.अ) स्त्रियांसाठी राखून ठेवावयाच्या एकूण जागा -

$$( \text{सूत्र} = \frac{\text{एकूण सदस्य संख्या}}{2} )$$

ब) स्त्रियांसाठी राखून ठेवावयाच्या एकूण जागांची विभागणी

१.अनुसूचित जातीच्या स्त्रियांसाठी

$$( \text{सूत्र} = \frac{\text{अनुसूचित जातीची आरक्षित सदस्य संख्या}}{2} )$$

२. अनुसूचित जमातीच्या स्त्रियांसाठी

$$( \text{सूत्र} = \frac{\text{अनुसूचित जमातीची आरक्षित सदस्य संख्या}}{2} )$$

३. नागरिकांच्या मागासवर्ग प्रवर्गाच्या स्त्रियांसाठी

$$( \text{सूत्र} = \frac{\text{नागरिकांच्या मागासवर्ग प्रवर्गाची आरक्षित सदस्य संख्या}}{2} )$$

४. सर्वसाधारण स्त्रियांसाठी उपलब्ध होणा-या उर्वरित जागा

( सूत्र = अ.क्र. १० (अ) - [ अ.क्र.१० (ब१) + १० (ब२)+ १० (ब३)] )

**टीप** :- स्त्रियांकरिता राखून ठेवावयाच्या जागांच्या संख्येची गणना करताना ०.५० हा अपूर्णांक पुढील संख्येस पूर्णांकित करण्यात यावा.

११. अराखीव -

( सूत्र = अ.क्र. ४ - [ अ.क्र.७ + अ.क्र.८ + अ.क्र.९+ १० ( ब ४ )] )

सही

आयुक्त, ..............

महानगरपालिका

परिशिष्ट - 2

## CORPORATION TOTAL POPULATION, SEATS & WARDS DETAILS - ELECTION 2022-23

| SR.NO. | NAME OF THE CORPORATION | TOTAL POPULATION | | | TOTAL SEATS | | GENERAL | | TOTAL SC | | TOTAL ST | | BCC | TOTAL BCC | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| | | TOTAL | S.C. | S.T. | TOTAL | WOMEN | TOTAL | GENERAL WOMEN | SC | SC WOMEN | ST | ST WOMEN | COMM REC. % | BCC | BCC WOMEN |
| 1 | BRIHANMUMBAI | 12442373 | 803236 | 129653 | 236 | 118 | 156 | 77 | 15 | 8 | 2 | 1 | 27 | 63 | 32 |